# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेस नोट //

मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, मिरा-भाईदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन शुद्धीकरण केलेल्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. तसेच महानगरपालिकेमार्फतदेखील पाण्याची शुद्धता कायम राहणेकामी आवश्यक ती दक्षता घेऊन पाणी वितरण करण्यात येते. तथापि शुद्ध पाणी वितरणानंतरही पाण्याची शुद्धता कायम राखणे आवश्यक आहे.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या पाणी साठवण (Underground & Overhead) टाक्यांची नियमितपणे साफ-सफाई करण्यात यावी. तसेच गळती प्रतिबंधक उपाययोजना करण्यात याव्यात जेणेकरुन शुद्ध पाण्यामध्ये अशुद्धता येणार नाही.

वरीलप्रमाणे आपल्या पाणी साठवण (Underground & Overhead) टाक्यांच्या साफ-सफाई बाबत दक्षता घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**